FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0167746

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. १९, वर्ष Year 2020 दिनांक Date 02/11/2020

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ७, १२,
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..., कलमे Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from २९/१०/२० वेळ Time १६.३०, तारीख पर्यंत Date to २९/१०/२० वेळ Time १८.०० वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २९/१०/२०२० वेळ Time १८.३० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. २८/२०२० तारीख Date २/११/२०२० वेळ Time १४.५० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ... Chouki / Beat / O.P. Name and No. ...
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सहायक आयुक्त (अ.बि.) पश्चिम उपनगरे गोदाम, फ्लोरल डेक प्लाझा बेसमेंट, ठिकाणाचे नंबर No. if any एम.आय.डी.सी. सेन्ट्रल रोड, गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road अंधेरी (पू)
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देंणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री रमेश गुप्ता (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name विश्वनाथ गुप्ता
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age वय ४६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८६५२५८५९४२
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue — दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation भाजीपाला विक्रेता
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste तेली, जनजात Sub-Caste ओ.बी.सी.
   (h) पत्ता Address : शास्त्रीनगर, गल्ली / सर्व्हे नं. Ward ... घर / नाव नं. House/Name No. ... फोन / मो. नं. Phone/Mo. No. ... पॅन नं. PAN No. ... कार्ड नं Card No. ...
   रस्त्याचे नाव Road वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place सहारा स्टार हॉटेल गाव Village ..., पोस्ट Post ... पो. स्टे. P. Stn. एम.आय.डी.सी. पो.ठाणे
   तालुका Taluka मेहनगर, जिल्हा Dist. आजमगढ राज्य State उत्तर प्रदेश सध्याचा पत्ता Present Address शास्त्री नगर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, सहारा स्टार हॉटेल जवळ, विलेपार्ले मुं.९९.

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फार्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

आलोसे क्र.१) विश्वास रामचंद्र नाडकर, वय ५५ वर्षे धंदा-कामगार आलोसे क्र.२) रमाकांत लक्ष्मण सोनकांबळे, वय ३२ वर्षे, धंदा-लिपीक नेमणूक अतिक्रमण निर्मुलन के/पूर्व व के/पश्चिम उपनगरे भ.म.न.पा. अंधेरी (पू) मुं.६९ आलोसे क्र.३) हर्षद शिवाजी वरळीकर, वय ३१ वर्षे धंदा-सुरक्षा रक्षक, नेमणूक-सुरक्षा रक्षक मंडळ, मुंबई आणि ठाणे जिल्हा महाराष्ट्र शासन स्थापित, ऑफिस डी-३०१/ई-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन, कॉम्प्लेक्स, सानपाडा, नवी मुंबई

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with CamScanner

खालील फिर्यादी श्री रमेश विश्वनाथ गुप्ता, वय ४५ वर्षे, धंदा भाजीपाला विक्रेता रा.ठी. शास्त्री नगर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, सहारा स्टार हॉटेल जवळ विर्ले-पार्ले (पूर्व) मुंबई. ९९ यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature] Bangosavi

(प्रविण बनगोसावी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Ramesh. v. Gupta
2/11/2020

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ खात्री करुन.

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी दि २१।१०।२०२० रोजी म.न.पा. के/पूर्व वार्ड अतिक्रमण निर्मुलन विभागातर्फे करण्यात आलेल्या कारवाईनंतर फिर्यादी यांचा माझी पाला ठेवणेस करेट परत देण्याकरीता दि. २१।१०।२०२० रोजी आलोसे क्र. ०१) यांनी रु. २५०/- इतक्या लाचेची मागणी करुन आलोसे क्र. २) यांनी रु. २५०/- इतक्या लाचेची रक्कम कायदेशिर पारिश्रमिक खेरीज स्विकारुन आलोसे क्र २) यांनी आलोसे क्र. २ यांच्याकडून लाचेच्या रक्कमेपैकी रु. ५०/- ही लाचेची रक्कम माहीत असुन ही ती स्विकारुन प्रोत्साहन दिले म्हणून गुन्हा कलम ७, १२, भ्र. प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

प्रविण बनगोसावी, पोलीस निरीक्षक,

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ —, जिल्हा ........ —, राज्य ........ —

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Ramesh w. Gupta 2/11/2020

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

संपूर्ण नाव Name प्रविण बनगोसावी,

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, Copy to: 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner

**फिर्याद** **दिनांक- ०२/११/२०२०.**

मी रमेश विश्वनाथ गुप्ता, वय ४६ वर्षे, धंदा- भाजीपाला विक्रेता, रा.ठी. शास्त्रीनगर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, सहारा स्टार हॉटेल जवळ, शिवसेना शाखेच्या मागे, विलेपार्ले (पुर्व) मुंबई - ९९. मो. क. ८६५२५८५९४२.

---------

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासह रहात आहे. मी गुजरात सोसायटी रोड, क्रॉस वर्तक रोड नाका, कल्पतरू बिल्डींगचे बाजुस, विलेपार्ले पुर्व, मुंबई ५७ येथे मागील दोन वर्षापासून भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करीत असून त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

मी करीत असलेल्या भाजीपाला व्यवसायाच्या ठिकाणी सतत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई चालू असते. दिनांक २९/१०/२०२० रोजी १०.३० वा. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिक्रमण निर्मुलन विभागाच्या पथक मी भाजीपाला विक्री करत असलेल्या ठिकाणी आले व त्यांनी माझा भाजीपाला विक्रीचा व्यवसाय हा अनधिकृत असल्याचे सांगून मी भाजीपाला विक्री करण्यासाठी ठेवलेला बाकडा हातोडीने तोडला व माझा भाजीपाला ठेवलेले सात कॅरेट कारवाईकरण्याकरीता सहाय्यक आयुक्त (अ.नि), पश्चिम उपनगरे यांचे गोदाम, फ्लोरल डेक प्लाझा बेसमेट, एम.आय.डी.सी. सेंट्रल रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई येथे घेऊन गेले. त्याप्रमाणे परिसरातील इतर विक्रेत्यावरही कारवाई करण्यात आली. त्यानंतर काहीवेळाने मी माझा भाजीपाला विक्रीचा माल सोडविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका अतिक्रमण पथक ज्या ठिकाणी कारवाईचे साहित्य जमा करतात त्याठिकाणी म्हणजे सहाय्यक आयुक्त (अ.नि.), पश्चिम उपनगरे यांचे गोदाम, फ्लोरल डेक प्लाझा बेसमेट, एम.आय.डी.सी. सेंट्रल रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई या ठिकाणी गेलो. सदर गोदामातील हजर असलेले लोकसेवक सोनकांबळे व माझे भाजीपाला विक्रीवर कारवाई करण्याऱ्या महिला अधिकारी श्रीमती नरवणकर यांनी मला माझा भाजीपालाचा माल कारवाई न करता सोडण्यासाठी रू. २०००/- रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना रू. २०००/- रक्कमेची पावती देणार काय? असे विचारले असता, लोकसेवक सोनकांबळे यांनी मला २००० रूपयाची पावती देण्यास नकार दिला. त्यावेळी मला संशय आला की, नमूद लोकसेवक अधिकारी व कर्मचारी हे माझ्याकडे लाचेची मागणी करत आहे. परंतु मला त्याना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दि. २९/१०/२०२० रोजी सायंकाळी उशीरा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पोनि बनगोसावी यांनी महिला लोकसेवक नरवणकर व लोकसेवक सोनकांबळे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा स्वहस्तक्षरात लेखी तक्रार अर्ज लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली.

दिनांक ३०/१०/२०२० रोजी ईद-ए-मिलाद निमीत्त शासकीय कार्यालय यांना सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे सहाय्यक आयुक्त (अ.नि.), पश्चिम उपनगरे यांचे गोदाम, फ्लोरल डेक प्लाझा बेसमेट, एम. आय.डी.सी. सेंट्रल रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई चे गोडाऊन बंद होते म्हणून मी दिनांक ३१/१०/२०२० रोजी शनिवारी वर नमुद गोडाऊन येथे गेलो असता सदर गोडाऊन चालू असल्याचे दिसून आले म्हणून मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, मुंबई चे अधिकारी प्रविण बनगोसावी यांना संपर्क करून त्याबाबत सांगितले.

Ramesh V. Gupta
2/11/2020



Scanned with CamScanner

त्यानंतर पोनि बनगोसावी यांनी मला ब्युरो कार्यालयात बोलावून पुढील पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असलेबाबत सांगून दोन शासकीय पंचांना व पडताळणी पथकाला पाचारण केले. त्यानंतर पोनि बनगोसावी यांनी दोन शासकीय पंचांची ओळख करून दिली. त्यावर पोनि बनगोसावी यांनी पंचांना माझे तक्रारअर्जासंदर्भात थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि बनगोसावी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि बनगोसावी यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यांनतर पोनि बनगोसावी यांनी मला पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील असलेल्या बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे माझे व लोकसेवक यांच्यातील संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दिनांक ३१/१०/२०२० रोजी लोकसेवक सोनकांबळे कार्यरत असलेल्या सहाय्यक आयुक्त (अ.नि.), पश्चिम उपनगरे यांचे गोदाम, फ्लोरल डेक प्लाझा बेसमेट, एम.आय.डी.सी. सेट्रल रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई येथे पडताळणीकरीता मला डिजीटल रेकॉर्डर लावून पंचासह पाठविले असता गोडाऊन मधील महिला अधिकारी श्रीमती नरवणकर व इतर लोकसेवकांची भेट झाली. त्यांच्यात व माझ्यात माझे भाजीपाल्याच्या धंदयावर झालेल्या कारवाई संदर्भात बोलणे झाले. त्यानंतर तेथे लोकसेवक श्री सोनकांबळे आले. त्यांनी मला, पंच श्री. चव्हाण व तिथे हजर असलेल्या इतर व्यक्तींना गोडाऊनच्या बाहेर काढले. त्यामुळे मी व पंच श्री चव्हाण गोडाऊनचे बाहेर आलो. काहिवेळाने मला एकटयाला गोडाऊनमध्ये प्रवेश दिला व पंच श्री. चव्हाण यांना गोडाऊनच्या बाहेर थांबण्यास सांगितले. मी गोडाऊनमध्ये गेल्यावर लोकसेवक सोनकांबळे यांचेजवळ जावून माझे भाजीपाला विक्रीच्या व्यवसायावरील कारवाईकरीता उचलून आणलेले कॅरेट परत मिळणेची विचारणा केली. तेव्हा लोकसेवक सोनकांबळे बोलले की, आंम्ही रिकामी कॅरेट देत नाही. त्यावेळस मी तेथे असलेले दोन कॅरेट माझे असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी लोकसेवक सोनकांबळे यांनी ' दोन्हींचे काय आहे ते देवून करुन घेवून जा ' असे सांगितले. त्यावेळी त्यांना मी ' बोला काय आहे ते ' असे त्यांना बोललो. त्यावेळी लोकसेवक सोनकांबळे यांनी ' ते साहेब मदत करतील म्हणून मला दुसरे लोकसेवक नाडकर यांच्याकडे पाठविले. त्यावेळी लोकसेवक नाडकर यांनी ' तिनसौ रुपये देदो ' असे मला सांगितले. त्यानंतर पुन्हा लोकसेवक नाडकर यांनी मला ' दो सौ रुपये दे ' और गार्ड को ' पचास रुपये दे ' असे बोलुन माझेकडे लाचेची मागणी केली. त्यानंतर पैसे घेवून येतो असे सांगून मी गोडाउनच्या बाहेर आलो व कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबलेल्या शासकीय वाहनाजवळ परत आलो.

त्यानंतर पोनि बनगोसावी यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यानी लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २५०/- (रू. १००/- दराच्या २ व रू.५०/- दराची १ भारतीय चलनी नोटा) स्वत:चे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्यात आली व ॲंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पोनि बनगोसावी यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा डावा हात केसांवरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा



Ramesh. v. Gupta
2/11/2020

Scanned with CamScanner

करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांचे सुचनेप्रमाणे पोलीस अंमलदारामार्फत पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस ॲथ्रासीन पावडर लावली व माझे शर्टाचे डाव्या बाजुस असलेल्या खिशात ठेवली. त्यांनतर पोनि बनगोसावी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे बनियनच्या आतील बाजुस लावून पंच श्री. चव्हाण यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक सोनकांबळे कार्यरत असलेल्या सहाय्यक आयुक्त (अ.नि.), पश्चिम उपनगरे यांचे गोदाम, फ्लोरल डेक प्लाझा बेसमेट, एम.आय.डी.सी. सेट्रल रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक सोनकांबळे बसलेल्या टेब्रलजवळ गेलो असता लोकसेवक सोनकांबळे यांनी मला 'काय आहे तुमच' असे विचारले त्यावर मी 'वो बोले थे पैसे का' असे बोललो. तेव्हा लोकसेवक सोनकांबळे यांनी हाताने इशारा करुन सदर लाचेची रक्कम देण्यास सागितल्याने माझे कडील ॲथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. २५०/- (रू. १००/- दराच्या २ व रू.५०/- दराची १ भारतीय चलनी नोटा) लोकसेवक सोनकांबळे यांचेकडे दिली असता, लोकसेवक सोनकांबळे यांनी ती स्विकारून त्यातील रू. ५०/- हे सुरक्षा रक्षक वरलीकर यांस दिली व उर्वरित रू.२००/- त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातमध्ये ठेवली. त्यांनतर लोकसेवक सोनकांबळे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यावर गोडाऊनच्या बाहेर येवून सापळा पथकास दिसेल अशारीतीने मी माझा डावा हात केसांवर फिरवून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक सोनकांबळे व सुरक्षा रक्षक वरलीकर यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. तसेच लोकसेवक नाडकर यांना देखील ताब्यात घेतले.

माझा भाजीपाला विक्रीचे व्यवसायावर बी.एम.सी. अतिक्रमण निमुर्लन विभागातंर्गत करण्यात आलेल्या कारवाईनंतर माझे भाजीविक्रीचे कॅरेट परत करण्याकरीता सहाय्यक आयुक्त (अ.नि.), पश्चिम उपनगरे यांचे गोदाम, फ्लोरल डेक प्लाझा बेसमेट, एम.आय.डी.सी. सेट्रल रोड, अंधेरी (पुर्व) मुंबई येथील गोडाऊनमधील लोकसेवक विश्वास नाडकर यांनी माझेकडे दि. ३१/१०/२०२० रोजी रू. २५०/- लाचेची मागणी केली व लोकसेवक रमाकांत सोनकांबळे यांनी लाचेची रक्कम स्विकारली व लोकसेवक हर्षल वरलीकर (सुरक्षारक्षक) यांनी त्यास सहाय्य केले म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक नाडकर, सोनकांबळे व वरलीकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

Ramesh.v.Lupta
2/11/2020

समक्ष,

Bangosavi

( प्रविण बनगोसावी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई



Scanned with CamScanner